**जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सर्वेक्षण कामांसाठी निधी वितरीत करणे बाबत.**

# महाराष्ट्र शासन
## जलसंधारण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः जशिअ-२०१५/प्र.क्र.३८/जल-४

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
तारीख: २३ फेब्रुवारी, २०१५

**वाचा -**

**१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र. अंदाज-२०१३/प्र.क्र.८५/२०१३/अर्थसंकल्प-३, दिनांक ४ फ़ेब्रुवारी, २०१५.**

**प्रस्तावना -**

मागणी क्रमांक एल-३ लेखाशिर्ष २७०२ ४७४५ अंतर्गत ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघुसिंचन (जलसंधारण) प्रकल्पांच्या सर्वेक्षणासाठी सन २०१४-१५ मध्ये अर्थसंकल्पित करण्यात आलेला निधी संदर्भिय परिपत्रकानुसार वितरणासाठी मुक्त करण्यात आला आहे. त्याकरिता क्षेत्रिय यंत्रणेने सादर केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने सर्हेक्षण निधीचे वितरण झालेले आहे. त्यानंतरही शिल्लक असलेला निधी हा जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरु असलेल्या कामांच्या सर्व्हेक्षणाकरिता वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**निर्णय-**

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सुरु असलेल्या ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघुसिंचन (जलसंधारण) प्रकल्पांच्या सर्वेक्षणाकरिता वैधानिक विकास मंडळ निहाय प्रमाणकाच्या मर्यादेमध्ये रुपये ७२४.२२ लक्ष (अक्षरी रूपये सातशे चोवीस लक्ष बावीस हजार फक्त) एव्हढा निधी खालीलप्रमाणे वितरीत करण्यासाठी याद्वारे, शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | ल.सि.(ज.सं) मंडळ, अमरावती | रुपये ३८.५० लक्ष |
| २) | ल.सि.(ज.सं) मंडळ, नागपूर | रुपये ३५.०० लक्ष |
| ३) | ल.सि.(ज.सं) मंडळ, औरंगाबाद | रुपये ६४.५० लक्ष |
| ४) | ल.सि.(ज.सं) मंडळ, ठाणे | रुपये ५७.०० लक्ष |
| ५) | ल.सि.(ज.सं) मंडळ, नाशिक | रुपये २७०.०० लक्ष |
| ६) | ल.सि.(ज.सं) मंडळ, पुणे | रुपये २५९.२२ लक्ष |
| | एकूण... | रुपये ७२४.२२ लक्ष |

२. याद्वारे वितरित करण्यात आलेली रक्कम संबधित लघुसिंचन (जलसंधारण) मंडळाच्या अधीक्षक अभियंता यांनी आहरित करुन, संबंधित अधिकाऱ्यांकडे त्वरेने वितरित करावी.

३. यावर होणारा खर्च पुढील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा आणि सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा.

मागणी क्र-एल.३,

२७०२, लहान पाटबंधारे

०१, भूपृष्ठ जल,

८०० इतर खर्च

पंचवार्षिक योजनांतर्गत योजना

(०२) लघु पाटबंधारे योजनांचे सर्वेक्षण

(०२) (०२) ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमते पर्यंतच्या पाटबंधारे योजनांचे सर्वेक्षण

२७ लहान बांधकामे (२७०२ ४७४५)

४. वरीलप्रमाणे वितरित रक्कम हि केवळ जलयुक्त शिवार अभियानांतर्गत निवड झालेल्या गावांमधील ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या लघुसिंचन (जलसंधारण) प्रकल्पांच्या सर्वेक्षणाच्या कामासाठी वापरण्यात यावी.

५. त्यानुषंगाने होणारा कामनिहाय खर्च हा वाजवी असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी किंबहुना वित्तीय औचित्याच्या अनुपालनाची जबाबदारी संबधित कार्यकारी अभियंता यांची राहिल. सबब सर्वेक्षणासाठीच्या वाजवी रक्कमेपेक्षा अधिक रक्कम वितरित होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

६. कोणत्याही कारणे निधीची गरज नसल्यास, सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परस्पर अन्य प्रयोजनार्थ विनियोगात न आणता सदर अखर्चित निधी तातडीने शासनाकडे प्रत्यार्पित करण्यात यावा.

७. याद्वारे वितरित निधीचा ताळमेळ ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ यांची राहिल व मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) पुणे हे सदर बाबींचे समन्वयक प्राधिकारी राहतील.

८. प्रस्तुत आदेश, संदर्भिय परिपत्रकान्वये प्रशासकिय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२२३१०५९४२८०२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh H Bagde

Digitally signed by Rajesh H Bagde
DN: CN = Rajesh H Bagde, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Water Conservation Department
Date: 2015.02.23 14:44:21 +05'30'

**(रा.हे. बागडे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे - ६.
२. अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), सर्व मंडळे.
३. कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग (संबधित).
४. मा. मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
५. मा. राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
६. सचिव (जलसंधारण), मंत्रालय, मुंबई.
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. संबधित जिल्हा कोषागार अधिकारी.
९. वित्त विभाग (व्यय-१५ व अर्थ-१७) मंत्रालय, मंत्रालय, मुंबई.
१०.नियोजन विभाग (का.१४११, १४१४, १४३४) मंत्रालय, मंत्रालय, मुंबई.
११.ग्राम विकास व जलसंधारण विभाग (जल-११) मंत्रालय, मंत्रालय, मुंबई.
१२.निवड नस्ती / जल-४.